जा.क्र.दूरशिक्षण/ 763
दि. 31 DEC 2020

अंतर्गत कार्यालयीन आदेश :

दूरशिक्षण केंद्रामध्ये बी.ए., बी.कॉम., एम.ए., एम.कॉम. एमबीए. एम.कॉम (व्हॅल्युशन ऑफ रिअल इस्टेट), पीजी डिप्लोमा इन ट्रान्सलेशन हे अभ्यासक्रम सुरु आहेत. सदर अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया दरवर्षी माहे जूनमध्ये सुरु होते. सदर प्रवेश प्रक्रियेवेळी प्रथम प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांचे दोन्ही सत्राचे प्रवेश नि परीक्षा अर्ज एकत्रितरित्या भरुन घेतले जातात. माहे ऑक्टोबर/नोव्हेंबरमधील हिवाळी सत्राच्या परीक्षेनंतर अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा नि प्रवेश अर्ज भरुन घेतले जातात.

दूरशिक्षण केंद्रातंर्गत प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांची माहिती विद्यापीठ अनुदान आयोग (UGC-DEB), नॅक (NAAC), AAA यांना पाठविणेसाठी तसेच विविध धोरणात्मक निर्णयविषयक बाबीच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांची अचूक व अद्यावत माहिती (Database) आवश्यक असते.

दूरशिक्षण केंद्राच्या विद्यार्थ्यांची अचूक व अद्यावत माहिती (Database) होणेसाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | डॉ. के. बी. पाटील, समन्वयक | अध्यक्ष |
| २ | श्री. व्ही. व्ही वरूटे, ऑफीस सुपरवायझर | सदस्य |
| ३ | श्री. एस. बी. कदम, वरिष्ठ सहा | सदस्य |
| ४ | श्री. एस. जे. घुणकीकर, वरिष्ठ सहा. | सदस्य |
| ५ | श्री. एस. एस. आडनाईक, क्लार्क कम ऑफीस असिस्टंट | सदस्य |
| ६ | श्री. पी. पी. जाधव, कनिष्ठ लेखनिक | सदस्य |
| ७ | श्रीमती टी. एम. भोसले, कनिष्ठ लेखनिक | सदस्य |
| ८ | श्रीमती आर. एल. परीट, कनिष्ठ लेखनिक | सदस्य |
| ९ | श्री. डी. एस. करवडे, क्लार्क कम ऑफीस असिस्टंट | सदस्य-सचिव |

उपरोक्त बाबी विचारात घेवून दूरशिक्षण केंद्राच्या प्रवेश नि परीक्षा करिताच्या संगणक प्रणालीमधील विद्यार्थी संख्येबाबतची माहिती (Database) निश्चित करणेसाठी विद्यापीठाचे सांख्यिकीय अधिकारी श्री अभिजीत रेडेकर यांचे मार्गदर्शन घेवून आवश्यक ती पुढील कार्यवाही करणेत यावी.

दूरशिक्षण केंद्राची शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ मधील विविध अभ्यासक्रमाची प्रवेश आणि परीक्षा अर्ज दि.३१.१२.२०२० पर्यंत स्वीकारणेत आलेले असून सदरची माहिती दि. १५.१.२०२० पर्यंत विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचेकडे विहित नमुन्यात सादर करावयाची आहे. सदर विहित नमुना यापूवी आपणाकडे दिलेला असून त्यांची एकत्रित माहिती सर्व सहा. प्राध्यापक यांचेशी समन्वय साधून तयार करून ती कार्यालयास हार्ड प्रतीत व सॉफ्टप्रतीमध्ये दि.१२.१.२०२१ पर्यत सादर करावी.

सांख्यिकी विभागाने दि. ३० डिसेंबर, २०२० रोजीच्या ई-मेलनुसार दूरशिक्षण विद्यार्थ्यांची सोबतच्या विहित नमुन्यात माहितीची मागणी केली असून आवश्यक असणारी माहिती सर्व सहा. प्राध्यापक यांचेशी समन्वय साधून तयार करावी. यापूर्वी काही सेवकांकडून विद्यार्थीसंख्येची चुकीची माहिती दिल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबतही संबंधितानी योग्य ती दक्षता घ्यावी.

उपरोक्तबाबत तयार झालेली माहिती डॉ. के. बी. पाटील, समन्वयक यांचेकडे तात्काळ सादर करावी त्यानुसार सदरची एकत्रित माहिती डॉ. के. बी. पाटील, समन्वयक यांनी श्री. व्ही. व्ही. वरूटे व श्रीमती टी. एम. भोसले यांच्या सहाय्याने ती पूर्ण करून घ्यावी.

उपकुलसचिव

प्रति,

सर्व संबंधित समन्वयक, सहा.प्राध्यापक व प्रशासकीय सेवक

प्रत : मा. संचालक यांना माहितीस्तव

जा.क्र. दूर शिक्षण केंद्र/ 129/2021
दि.१३.२.२०२१ 9 MAR 2021

अंतर्गत कार्यालयीन आदेश :

संदर्भ : - १. जा.क्र.दूरशिक्षण केंद्र/४२८, दि. १८ जुलै, २०२०
२. जा.क्र.दूरशिक्षण केंद्र/१०५६, दि. ९.१२.२०१९

उपरोक्त संदर्भानुसार, दूरशिक्षण केंद्रामध्ये आपण समन्वयक/सहा.प्राध्यापक म्हणून कार्यरत असून महिन्याच्या पहिल्या आठवडयात आपल्याकडून केलेल्या कामाचा मासिक अहवाल कार्यालयास सादर आपणास यापूर्वी कळविणेत आलेले आहे. तथापि काही समन्वयक/सहा.प्राध्यापक यांनी अद्यापि यापूर्वीचे मासिक अहवाल सादर केलेले नाहीत तरी यापूर्वीचे व जानेवारी २०२१ चा मासिक अहवाल तात्काळ सादर करावेत. सदर अहवालामध्ये काही नियमित बाबींची कार्यवाही उदा. फोन घेणे, माहिती देणे, कामानिमित्त केलेल्या चर्चा, ई-मेल तपासून कार्यवाही करणे, विद्यार्थ्यांना दिलेली माहिती प्रवेश, स्वयंअध्ययन साहित्य माहिती इ. चा उल्लेख असतो. तथापि त्यामध्ये आपणास कार्यालयाद्वारे काही कामकाज करणेबाबत केलेल्या अग्रेषित करणेबाबतच्या महत्वाच्या सूचना/बाबींचा (ई- कन्टेंट व्हिडीओ, विविध समितीमध्ये केलेल्या पूर्ण केलेल्या कार्यवाहीची माहिती, स्वयंअध्ययन साहित्य लेखन, स्वाध्याय निर्मिती, संपर्कसत्राचे आयोजनाची माहिती, विविध विभागास पाठविण्यात आलेली माहिती इ. महत्वापूर्ण बाबींचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

तरी याबाबत कळविण्यात येते की, आपले मासिक अहवाल सादर करताना खालील नमुन्यात सादर करावा.

- ☐ सहा.प्राध्यापकाचे नाव ---------------------------------
- ☐ विषय ---------------------------------
- ☐ कालावधी ---------------------------------

| अ.क्र | तपशील |
|---|---|
| १ | प्रवेश |
| २ | इ-कन्टेंट निर्मिती |
| ३ | स्वाध्यायनिर्मिती |
| ४ | संपर्कसत्रे<br>मुख्यालय<br>अभ्यासकेंद्रे |
| ५ | परीक्षा व तद्षंगिक कामकाज |
| ६ | विद्यार्थी मार्गदर्शन |
| ७ | विविध समितीमध्ये केलेले कामकाज,<br>विविध विभागास दिलेली माहिती व<br>आवश्यक इतर माहिती |

उपकुलसचिव 6.3.2021

प्रति,
१. सर्व समन्वयक
२. सर्व हंगामी सहाय्यक प्राध्यापक व समन्वयक
प्रत : मा. संचालक, दूरशिक्षण केंद्र – यांना माहितीस्तव

13.2.2021

दूरशिक्षण केंद्र

अहवाल नमुना

दिनांक ..................

| | | |
|---|---|---|
| ☐ | सहा.प्राध्यापकाचे नाव | ------------------------------------ |
| ☐ | विषय | ------------------------------------ |
| ☐ | कालावधी | ------------------------------------ |

| अ.क्र | तपशील | |
|---|---|---|
| १ | प्रवेश व प्रवेशप्रक्रिया नियोजन | |
| २ | इ-कन्टेंट निर्मिती | |
| ३ | स्वाध्यायनिर्मिती | |
| ४ | संपर्कसत्रे<br>मुख्यालय<br>अभ्यासकेंद्रे | |
| ५ | परीक्षा व तद्‌षंगिक कामकाज | |
| ६ | विद्यार्थी मार्गदर्शन | |

हंगामी सहा. प्राध्यापकाचे नावे